महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमीअभिलेख (म.राज्य) , पुणे
दूसरा व तिसरा मजला , नवीन प्रशासकीय इमारत , विधानभवनसमोर , कॅम्प , पुणे
दूरध्वनीक्र. ०२०-२६१३७११० Web site: https://mahabhumi.gov.in

---

दि.१४/३/२०२४

# - प्रसिध्दीपत्रक -

**विषय :- महसूल विभागातील गट - क संवर्गातील तलाठी भरती सन २०२३ बाबत. निवड यादी व प्रतिक्षा यादी प्रसिध्दी बाबत.**

महसूल विभागाचतील गट - क संवर्गातील तलाठी भरती सन २०२३ चे अनुषंगाने दि.११/३/२०२४ रोजी सुधारीत गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुधारित गुणवत्तायादीचे आधारे राज्यातील ३६ जिल्हा निवड समित्यांनी तयार केलेल्या **निवड यादया व प्रतिक्षा यादया** https://mahabhumi.gov.in या संकेतस्थळावर दि. १४/०३/२०२४ रोजी प्रसिध्द करणेत आलेल्या आहेत. तसेच सदर सर्व यादया जिल्हाधिकारी यांना त्यांच्या जिल्हयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत सूचित करणेत आले आहे.

प्रत्येक जिल्हयांच्या जिल्हा निवड समित्या या तलाठी भरतीचे सक्षम प्राधिकरण असल्याने यापुढील कार्यवाही जसे की, कागदपत्रे, चारित्र्य, आरोग्य, ओळख, इ. पडताळणी प्रक्रिया किंवा यादीशी संबंधित बाबीसाठी संबंधित जिल्हयांच्या संकेतस्थळांना भेट दयावी किंवा जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधवा.

स्वाक्षरी xxx/-
**(सरिता नरके )**
**प्रभारी राज्य परीक्षा समन्वयक तथा**
**अपर जमाबंदी आयुक्त, आणि अतिरिक्त संचालक**
**भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे**